**<u>ठळक बातम्या</u>**

- वक्फ सुधारणा कायद्याला पूर्ण स्थगिती द्यायला सर्वोच्च न्यायालयाचा नकार/ तीन तरतुदींना दिली तात्पुरती स्थगिती

- वक्फ दुरुस्ती विधेयकावरच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचं केंद्र सरकारकडून स्वागत

- नवनियुक्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांचा शपथविधी

- शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा नाशिकमध्ये मोर्चा, बंजारा समाजाचा बीड आणि जालन्यात मोर्चा

**आणि**

- पावसामुळे राज्याच्या अनेक भागात जनजीवन विस्कळीत

**<><><><><><>**

सर्वोच्च न्यायालयानं वक्फ सुधारणा कायदा २०२५ ला पूर्णपणे स्थगिती द्यायला नकार दिला असून या कायद्यातल्या काही तरतुदींना स्थगिती दिली आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई आणि न्यायमूर्ती ए जी मसीह यांच्या खंडपीठानं हा निर्णय दिला. वक्फ करण्यासाठी देणगीदार किमान पाच वर्षे इस्लाम धर्माचा अनुयायी असावा ही तरतूद न्यायालयानं स्थगित केली आहे. वक्फ मालमत्तेचं सरकारी मालमत्तेवर अतिक्रमण झालं की नाही हे ठरवण्याचा अधिकार शासनानं नेमलेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना बहाल करण्यालाही खंडपीठानं स्थगिती दिली आहे. तसंच वक्फ बोर्डावर मुस्लिमेतर व्यक्तीची नेमणूक करण्याची तरतूद यासंदर्भात राज्य सरकारांनी ठोस नियम करेपर्यंत स्थगित राहील, असं न्यायालयानं स्पष्ट केलं.

आज दिलेला निवाडा प्रथमदर्शनी निरीक्षणांवर आधारित असून, खटल्याची सविस्तर सुनावणी नंतर होईल, असंही न्यायालयानं सांगितलं.

**<><><><><><>**

वक्फ दुरुस्ती विधेयकावरच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचं केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी स्वागत केलं आहे. मुंबईत माध्यमांशी बोलताना त्यांनी ही प्रतिक्रिया दिली. प्रदीर्घ काळ चाललेल्या चर्चेनंतर हे विधेयक संसदेत मंजूर झालं असून त्याचा लाभ सर्व मुस्लीम समुदायाला होईल, असं ते यावेळी म्हणाले. सरकारने या विधेयकामागचे तर्क आणि तथ्यं न्यायालयासमोर सादर केले आहेत. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल हा विधेयकामागच्या दृष्टिकोनाचा विजय असल्याचं रिजिजू म्हणाले.

मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसरात भाषिक वारसा आणि सांस्कृतिक अभ्यास केंद्राचं भूमिपूजन आज रिजिजू यांच्या हस्ते झालं. या कार्यक्रमात मुंबई विद्यापीठाशी संलग्न विविध संस्थांमधल्या शिक्षकांचा सत्कारही करण्यात आला. अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयाचे सचिव डॉ. चंद्रशेखर कुमार, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्राध्यापक रवींद्र कुलकर्णी आणि इतर उपस्थित होते.

**<><><><><><>**

नवनियुक्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज मुंबईच्या राजभवनात राज्यपाल पदाची शपथ घेतली. मुंबई उच्च नायायालयाचे मुख्य न्यायाधीश श्री चंद्रशेखर यांनी आचार्य देवव्रत यांना पदाची शपथ दिली. आचार्य देवव्रत यांनी संस्कृत भाषेत शपथ घेतली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह इतर मान्यवर उपास्थित होते. माजी राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची देशाच्या उपराष्ट्रपतीपदी निवड झाल्यामुळे गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांना महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात

आला आहे. आचार्य देवव्रत हे २०१९ पासून गुजरातचे राज्यपाल आहेत. त्याआधी त्यांनी हिमाचल प्रदेशाचे राज्यपाल म्हणून जबाबदारी सांभाळली होती.

<><><><><>

राज्यातल्या जनतेसाठी सर्वसमावेशक कर्करोग सेवा उपलब्ध करून देण्यासाठी वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्यं विभागानं धोरण तयार करावं, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत दिले. कर्करोगावर प्रभावी उपचार मिळण्यासाठी विविध पातळ्यांवर उपचार केंद्रं उभारणं गरजेचं असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. कर्करोगाशी लढणाऱ्या रुग्णांना शीघ्र निदान आणि प्रभावी उपचार पद्धती उपलब्ध करून द्यावी. प्रत्येक जिल्ह्यात समग्र कर्करोग उपचार सेवा, निदान, डे केअर रेडिओथेरेपी आणि किमोथेरपी युनिटची उभारणी करावी, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

<><><><><>

बीड जिल्ह्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या अहिल्यानगर - बीड - परळी - वैजनाथ या नवीन ब्रॉडगेज रेल्वेमार्गासाठी शासनानं दिलेला अतिरिक्त १५० कोटी रुपयांचा निधी आज वितरित करण्यात आला. या प्रकल्पासाठी आजपर्यंत शासनानं २ हजार ९१ कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत. या योजनेच्या बीड-अहिल्यानगर या टप्प्यावरच्या रेल्वेसेवेचा प्रारंभ १७ सप्टेंबर रोजी, म्हणजे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी होणार आहे.

<><><><><>

विदर्भात चित्रपट निर्मिती आणि रोजगाराची संधी उपलब्ध होण्यासाठी रामटेक इथं उभारण्यात येणाऱ्या चित्रनगरीसाठी येत्या ६० दिवसात जमीन हस्तांतरित करण्याचा आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आल्याची माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी आज दिली. ते रामटेक जवळच्या नवरगाव इथल्या प्रस्तावित चित्रनगरीच्या जागेची

पाहणी केल्यानंतर बोलत होते. रामटेकच्या प्राचीन गड मंदिर परिसरात भाविकांसाठी अद्ययावत सोयी सुविधा उभारण्यासंदर्भात पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचंही ते म्हणाले. 'रामटेक मंदिर हेरिटेज कॉरिडॉर' राज्य विधिमंडळाच्या आगामी अर्थसंकल्पात मंजूर करण्यात येईल तसच १५६ एकरात प्राचीन मूल्य असणारी 'प्राचीन वारसा स्थळे मनसर' संवर्धनाच्या प्रकल्पाला गती देण्यासाठी लवकरच केंद्रीय सांस्कृतिक मंत्र्यांची भेट घेणार असल्याचंही शेलार म्हणाले.

<><><><><>

व्यक्तीकडून व्यापाऱ्याला यूपीआयच्या माध्यमातून पेमेंट करण्याची मर्यादा एका दिवसाला दहा लाख रुपयांपर्यंत वाढवण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी आजपासून सुरू झाली. डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देणं आणि प्रमुख क्षेत्रांमधे पेमेंटची सुविधा सुलभ करणं हा यामागचा हेतू आहे. यापूर्वी वापरकर्त्यांना पेमेंट विभागून करावं लागायचं किंवा धनादेश अथवा बँकेद्वारे पैसे हस्तांतिरत करावे लागत असत. नव्या नियमामुळे ही अडचण दूर होणार आहे.

व्यक्तीकडून व्यक्तीला पेमेंट करण्याची मर्यादा मात्र दिवसाला एक लाख रुपये इतकीच ठेवण्यात आली आहे.

<><><><><>

शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी या आणि इतर मागण्यांसाठी आज नाशिकमधे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे मोर्चा काढण्यात आला.विधानसभा निवडणुकीच्या वेळी राज्यसरकारने शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचं आश्वासन दिलं होतं. त्याची महिनाभरात अंमलबजावणी करावी अशी मागणी पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी केली. राज्यात गेल्या २ महिन्यात २ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून हे चित्र भयावह आहे असं ते म्हणाले. खासदार सुप्रिया सुळे देखील मोर्चात सहभागी झाल्या होत्या. शेतकऱ्यांनी आपापल्या जिल्ह्यात

जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन द्यावं असं आवाहन त्यांनी केलं. मागणी मान्य झाली नाही तर राज्यभर मोर्चे काढण्यात येतील असा इशारा शरद पवार यांनी दिला.

**<><><><><>**

हैदराबाद गॅझेटनुसार बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गातलं आरक्षण मिळावं या मागणीसाठी आज जालना शहरात मोर्चा काढण्यात आला. अंबड चौफुली इथं सभा घेऊन जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचं निवेदन देण्यात आलं. यात मोठ्या संख्येने बंजारा बांधव, महिला आणि तरुण सहभागी झाले होते.

याच मागणीसाठी बीडमध्येही आज मोर्चा झाला. यात मोठ्या संख्येने लोक सहभागी झाले होते. त्यामुळे नगर रस्त्यावरची वाहतूक पुर्णत: ठप्प झाली.

**<><><><><>**

राज्यात अनेक ठिकाणी मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. **पुणे** शहरात काल झालेल्या पावसाचा फटका विमानसेवेला बसला. आज सकाळी आठ वाजेपर्यंत पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरवण्यात येणारी १४ विमानं अहमदाबाद, हैदराबाद, सूरत, मुंबई या विमानतळांवर उतरवण्यात आली. तर पुणे विमानतळावरची तीन उड्डाणं माघारी उतरली. **परिस्थिती पूर्ववत झाल्यानंतरही विमानफेऱ्यांना विलंब दिसून आला**. हवेली तालुक्यामध्ये थेऊर गावात ओढ्याला पूर आल्याने अडकलेल्या दीडशे जणांना वाघोली अग्निशमन दल आणि पीडीआरएफच्या पथकांनी सुरक्षितपणे बाहेर काढलं. **अहिल्यानगर**मध्ये पाथर्डी तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे करंजी, मढीसह अनेक गावांचा संपर्क तुटला असून अनेक ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरलं आहे. **कल्याण–विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्ग, बारामती–छत्रपती संभाजीनगर काही राज्य महामार्ग तसंच पाथर्डी–बीड राज्य महामार्ग बंद करण्यात आले आहेत. सांगली** शहरासह जिल्ह्यात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस झाल्याने अनेक सखल भागात पाणी साचलं आहे. काढणीला आलेल्या सोयाबीन आणि उडीद पिकाचं नुकसान

झालं आहे. **लातूर** जिल्ह्यात संततधार पावसामुळे तेरणा धरणाचे १२ दरवाजे तर मांजरा धरणाचे ४ दरवाजे उघडले असून नदीकाठच्या गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. औसा तालुक्यात उजनी गावामध्ये तेरणा नदीच्या पुराचे पाणी घुसल्याने काही जणांना स्थलांतरित करण्यात आलं आहे. नदीकाठच्या शेतातही पुराचं पाणी घुसल्याने पिकांचंही मोठं नुकसान झालं आहे. **बीड** जिल्ह्यात झालेल्या जोरदार पावसामुळे अनेक मोठ्या प्रकल्पांचे दरवाजे उघडण्यात आले आहेत. त्यामुळे नद्यांना पूर येऊन अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. तर सात गावांमध्ये मिळून ५१ जण पुरात अडकले असून त्यांच्या सुटकेसाठी एनडीआरएफ पथकाला पाचारण करण्यात आलं आहे. आष्टी तालुक्यात ५ ते ६ गावं पूर्णपणे पाण्याखाली गेली असून हवाई दलाच्या मदतीने गावांतल्या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढलं जात आहे. **जालना** जिल्ह्याच्या बहुतांश भागात आजही जोरदार पाऊस झाल्याने पिकं पाण्याखाली गेली आहेत. अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. **नागपूर** जिल्ह्यातही मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या नैसर्गिक संकटात नागरिकांना तातडीची मदत उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. राज्यात परतीच्या पावसामुळे खरीपाचा हंगाम वाया गेला असून सरकारने बाधित शेतकऱ्यांना सरसकट ५० हजार रुपयांची तातडीची मदत द्यावी अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

**<><><><><><>**

राज्यात  मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दुपारी मंत्रालयातल्या राज्य आपत्कालिन कार्य केंद्राला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. मुंबईत जिथे जिथे पाणी साचल्याच्या तक्रारी येत आहेत तिथे अतिरीक्त मनुष्यबळ तैनात करून लवकरात लवकर पाण्याचा निचरा होण्यासाठी पंप बसविण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

<><><><><>

सेवा आणि सुशासन या मूल्यांच्या आधारवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली केंद्र सरकारचं कामकाज सुरू आहे. सेवा पर्व या विशेष मालिकेच्या अंतर्गत स्वच्छ भारत मोहिमेद्वारे प्रत्येक नागरिकाचं आयुष्य कसं बदललं हे आपण जाणून घेणार आहोत....

**होल्ड कॅप्सूल**

स्वच्छ भारत अभियानाला अकरा वर्षांपूर्वी सुरूवात झाली. १५ ऑगस्ट २०१४ रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून याची घोषणा केली.

<><><><><>

प्रलंबित कामकाजाचा निपटारा करण्याच्या उद्देशाने येत्या २ ऑक्टोबरपासून स्वच्छता अभियान 5.0 केंद्र सरकारने जाहीर केलं आहे. प्रलंबित तक्रारींचा निपटारा, जागेचं आणि दप्तरनोंदींचं प्रभावी व्यवस्थापन, ई कचऱ्याची विल्हेवाट आणि कार्यालय परिसराचं सौंदर्यीकरण अशा उपक्रमांचा या अभियानात समावेश असेल. असं केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण विभागाने म्हटलं आहे.

<><><><><>

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेमध्ये राज्यात नवीन 2 हजार 399 उपचारांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच पाच लाखापेक्षा जास्त रक्कमेच्या अवयव प्रत्यारोपणाच्या उपचारांसाठी कॉर्पस फंड निर्माण करण्यासही यावेळी मान्यता देण्यात आली.

जन आरोग्य योजनेत समाविष्ट असलेल्या रुग्णालयाना त्यांची देयके वेळेत देण्यात यावेत. जेणेकरून ती रुग्णालये रुग्णांना दर्जेदार उपचार देतील. तसेच या

योजनेतील उपचार, रुग्णालये, लाभ यांची माहिती मिळण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ॲप तयार करावे, असे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले.

**<><><><><>**

हिंगोली जिल्ह्यातून जाणाऱ्या शक्तीपीठ महामार्गासाठी अधिग्रहित केल्या जाणाऱ्या जमिनीच्या मोजणीबाबत अडथळा निर्माण झाला आहे. कळमनुरी तालुक्यातल्या भाटेगाव, डोंगरकडा, जवळापांचाळ, जामगव्हाण, सुकळीवीर, वसफळ, गूंडलवाडीमधल्या शेतकऱ्यांनी आज या मोजणीला प्रखर विरोध करत आंदोलन केलं. यावेळी त्यांनी शासनाच्या विरोधात घोषणाही दिल्या. त्यापैकी काही शेतकऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्यानं परिसरातली स्थिती तणावग्रस्त झाली होती.

**<><><><><>**

यूनिसेफ भारत आणि पत्र सुचना कार्यालयानं **(पीआयबी)** आज मुंबईत बालकांमधे आढळणाऱ्या संसर्गजन्य नसलेल्या रोगांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी कार्यशाळा आयोजित केली होती. शाळांमध्ये तपासणी वाढवणं, आवश्यक औषधांवर सवलती देणं आणि जिल्हा स्तरावरची आरोग्यसेवा सुधारणं ही राज्याची प्राथमिकता असल्याचं या कार्यशाळेत स्पष्ट करण्यात आलं.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघटनेच्या महिला एकदिवसीय विश्वचषक आज मुंबईत दाखल झाला. या पार्श्वभूमीवर एमसीएनं अर्थात मुंबई क्रिकेट संघटनेनं महिला क्रिकेट संघाचं नेतृत्व करणाऱ्या मुंबईकर महिला कर्णधारांचा आज विशेष प्रातिनिधिक सन्मान केला. त्यासाठी एमसीएनं मुंबईतल्या बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स मधल्या शरद पवार क्रिकेट अकॅडेमीतल्या एका भिंतीवर मुंबईकर महिला

कर्णधारांची छायाचित्र प्रदर्शित केली. या प्रदर्शनात १९७८ मध्ये झालेल्या पहिल्या महिला विश्वचषकात भारतीय महिला क्रिकेट संघाचं नेतृत्व करणाऱ्या डायना एडल्जी यांच्यासह आगामी महिला कर्णधार जेमिमा रॉड्रिग्सच्या छायाचित्राचाही समावेश आहे. यावेळी एमसीएचे अध्यक्ष अजिंक्य नाईक यांच्यासह राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळणाऱ्या मुंबईकर महिला क्रिकेटपटू उपस्थित होत्या.

**<><><><><><>**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात पुढचे दोन दिवस बहुतांश ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. तर या विभागांमध्ये तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडेल, असा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

**//<><><><><><>//**